Postal Reg No. G2/47/CHA-304/2022-23

www. sahyandrinews.com

# सह्याद्रीचा राखणदार

Scan QR code to visit... Epaper Portal


• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• चंद्रपूर (महाराष्ट्र) • वर्ष ०६ वे • RNI : MAHMAR/2018/77866 •सोमवार दि.२८ ऑगस्ट २०२३ • अंक ३५ • पाने ४ • पान १ • मो.९०११७०८८४० • किंमत २ रु. • ( ई पेपर)

# मृत्यूनंतरही मदतीचा हात

## अंत्यसंस्कारासाठी मृतकांच्या कुटुंबियांना दोन हजाराची मदत

### हिवरा ग्रामपंचायतीचे विधायक कार्य:समाजासाठी निर्णय आदर्श ठरत आहे






**गोंडपिपरी । सुरज माडुरवार**

**ग्रामपंचायत म्हटलं की सामान्य फंड असतोच.खास करून अत्यावश्यक सुविधा इतरही आवश्यक बाबींकरिता सामान्य फंडाचा वापर होत असतो.परंतु अनेक ग्रामपंचायतीमध्ये शंभर टक्के कर वसुली होत नसल्याने सामान्य फंडात नेहमीच निधी कमी असते.अशाही स्थितीत अडचणींवर मात करून हिवरा ग्रामपंचायतीने इच्छाशक्तीच्या जोरावर ऐतिहासिक निर्णय घेत अनेकांपुढे आदर्श निर्माण केला.**

चंद्रपूर जिल्ह्यातील गोंडपिपरी तालुक्यातील हिवरा ग्रामपंचायतीने सन २०१७-१८ पासून स्वनियोजित निर्णय घेत सात वर्षे पासून मृत्यू पावलेल्या व्यक्तीच्या कुटुंबीयांना अंत्यसंस्कारासाठी सामान्य फंडातून दोन हजार रुपयाची मदत देत असते. आणि ही मदत आजतागायत अविरत चालवलेली चंद्रपूर जिल्ह्यातील पहिली ग्रामपंचायत ठरली आहे. मागील सन २०१७ मध्ये ग्रामपंचायत हिवरा येथे स्थापन झालेल्या कमिटीनी त्या दरम्यान ठराव मंजूर करत गावातील मृत पावलेल्या व्यक्तीच्या कुटुंबांना (तो गरीब असो वा श्रीमंत)दोन हजार रुपये सामान्य फंडातून मदत करायचे असे ठरले. त्या दरम्यान माजी सरपंच सुशीला निलेश पुलगमकर उपसरपंच प्रकाश हिवरकर व त्यांची सदस्य कमिटी यांनी कोणत्याही कुटुंबातील व्यक्ती मृत्त पावल्यानंतर त्या कुटुंबावर दुःखाचे डोंगर कोसळते त्या दुःखात असलेल्या कुटुंबीयांना सावरण्यासाठी थोडीफार मदत होईल या दृष्टिकोनातून अंत्यसंस्कारसाठी त्यांना सामान्य फंडातून दोन हजार रुपये अविरत मदत देण्याचा सर्वानुमते ठराव मंजूर करण्यात आला.तेव्हापासून त्या कमिटीने अंत्यसंस्कारसाठी दिली जाणारी मदत सन २०२०-२१ पर्यंत सतत चालवली.दरम्यान आताची सन २०२१ नंतर विद्यमान कमिटी सरपंच निलेशभाऊ पुलगमकर व उपसरपंच वर्षा कूत्तरमारे व कमिटीने त्या निर्णयाला कायम ठेवत अजूनही हे अंत्यसंस्काराची मदत सेवा अविरत देत आहे. जवळपास या निर्णयानंतर सात वर्षाच्या कालावधीत हिवरा गावातील शंभर ते सव्वाशे मृत्त पावलेल्या कुटुंबीयांना सामान्य फंडाचे दोन ते अडीच लाख रुपये खर्च करून अंत्यसंस्कारासाठी हिवरा ग्रामपंचायतीने मदत दिली आहे. अशी निरंतर व अविरत मदत सेवा देणारी चंद्रपूर जिल्ह्यातील ही पहिलीच ग्रामपंचायत ठरली आहे. दरम्यान या दोन महिने पूर्वी सामान्य फंडाच्या अपुऱ्या निधीमुळे गावातील महिनाभरापूर्वी मृत पावलेल्या कुटुंबीयांना अंत्यसंस्काराची मदत वेळेवर देणे शक्य झाले नसल्याने त्यांची मदत फंडात काही अल्प प्रमाणात निधी जमा झाल्यावर तात्काळ गावातील कूत्तरमारे,लखमापुरे व चहारे या तीनही कुटुंबांना मदत देऊन ही अविरत मदत सेवा कायमस्वरूपी चालवणार व समोरील येणाऱ्या ग्रामपंचायतीवरील कमिटीने सुद्धा चालवावी अशी आशा व्यक्त करत असल्याचे मत सरपंच निलेश पुलगमकर यांनी व्यक्त केले. सदस्य जितेंद्र गोहणे,सदस्या पुष्पा हिवरकर,प्रतिमा आक्केवार,देवानंद आक्केवार,अरुणा नेवारे,ग्रामसेवक पी.डी राऊत,ऑपरेटर उमेश पूलगमकर,शिपाई विद्या गुंडावार, चेतन पुलगमकर ग्रामपंचायतीतुन सेवा देत आहेत.

## जेसीबीने ना.धर्मराव बाबा आत्राम यांच्यावर फुलांचा वर्षाव करून एटापल्लीत भव्य स्वागत

**गडचिरोली । प्रतिनिधी**

**राज्याचे अन्न व प्रशासन मंत्री धर्मराव बाबा आत्राम यांचे शनिवारी (२६ ऑगस्ट) एटापल्लीत भव्य स्वागत करण्यात आले.शहरातील मुख्य चौकात जेसीबी मशीन मधून त्यांच्यावर फुलांचा वर्षाव करण्यात आला.क्रेनद्वारे हार घालत त्यांचे भव्य स्वागत करण्यात आले.यावेळी मंत्री आत्राम यांच्यासोबत त्यांची ज्येष्ठ कन्या जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष तथा सिनेट सदस्य भाग्यश्री आत्राम,युवा नेते ऋतुराज हलगेकर,सुपुत्र हर्षवर्धन बाबा आत्राम सहभागी होते.**




राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री धर्मराव बाबा आत्राम हे मागील चार दिवसांपासून जिल्ह्याच्या दौऱ्यावर आहेत. अहेरी विधानसभेतील सिरोंचा, अहेरी-भामरागड,मुलचेरा या तालुक्यांचा आढावा घेऊन २६ ऑगस्ट रोजी ते एटापल्ली तालुक्यात पोहोचले.मंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर त्यांचा एटापल्ली तालुक्यातील हा पहिलाच दौरा होता.त्या अनुषंगाने एटापल्लीकरांनी त्यांचा भव्य नागरी सत्कार केला.पारंपरिक आदिवासी रेला नृत्य आणि ढोल पथकासह मुख्य चौकात मिरवणूक काढण्यात आली.शहरातील मुख्य चौकात आगमन होताच त्यांनी भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्यासह इतर थोर महापुरुषांच्या प्रतिमांना हार अर्पण केला.त्यानंतर मिरवणुकीला सुरुवात झाली.जेसीबी मशीन द्वारे एटापल्ली करांनी त्यांच्यावर फुलांचा वर्षाव केला.भव्य मिरवणूक दरम्यान विविध ठिकाणी शॉल,श्रीफळ व पुष्पुच्छ देऊन ना.आत्राम यांचा सत्कार करण्यात आला. फटाक्यांची आतिषबाजी करत 'धर्मराव बाबा आगे बढो.. हम तुम्हारे साथ है..' अश्या घोषणा देत राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे झेंडे हातात घेत मोठ्या संख्येने खेड्यापाड्यातील नागरिक मिरवणुकीत सहभागी झाले होते.यावेळी संपूर्ण एटापल्ली चौक राष्ट्रवादीमय झाल्याचे दिसून आले.मिरवणुकीमध्ये एटापल्लीकर मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. अमाप उत्साह दिसून आला तर गर्दीमुळे रस्ते फुलून गेले. धर्मराव बाबा आत्राम यांच्या समर्थनार्थ जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. एटापल्ली तालुका मुख्यालयात पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. नागरी सत्कार कार्यक्रमासाठी एटापल्ली तालुक्यातील राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी अथक परिश्रम घेतला.

## अभ्यासाचे पूर्वनियोजन करून यश मिळवा-ठाणेदार अविनाश मेश्राम

**चिमूर । प्रतिनिधी**

स्पर्धा परीक्षेचं जग जसं चांगलं आहे, तसं घातक सुद्धा आहे. यामध्ये यश मिळवायचं असेल तर तुम्हाला अभ्यासाचे पूर्वनियोजन करावे लागेल, असे प्रतिपादन शेगाव पोलीस स्टेशनचे ठाणेदार सहाय्यक पोलीस निरीक्षक अविनाश मेश्राम यांनी केले. दिनांक २६ऑगस्ट २०२३ रोजी ब्राईटएज फाउंडेशन मार्फत सुरू असलेला मॅजिक उपक्रमाला त्यांनी भेट दिली. त्यावेळी ते बोलत होते.



मॅजिकच्या माध्यमातूनविविध स्पर्धा परीक्षांची तयारी करत असलेल्या आदिवासी विद्यार्थ्यांना आवश्यक असलेल्या सर्व सुविधा देण्यात येत आहे. हे सर्व आदिवासी लोकांकडून मिळालेल्या देणगीतून व मदतीतून चालवण्यात येते. म्हणजे पे बॅक टू सोसायटीची संकल्पना रुजलेली आहे, ही अतिशय परिवर्तनशील व अभिनंदन या बाब आहे. याबाबत त्यांनी आश्चर्य व्यक्त केले. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असणारे संजय बोधे यांनी मॅजिक मधील सुविधांचा लाभ घेऊन विद्यार्थ्यांनी अभ्यासात सातत्य ठेवून यशाला गवसणी घालावी व समाजऋण परत करावे, असे मत व्यक्त केले.अविनाश मेश्राम यांनी विद्यार्थ्यांसोबत हीतगूज साधत असताना स्वतः वापरत असलेल्या अभ्यासाच्या विषय सखोल मार्गदर्शन केले. त्यापूर्वी त्यांनी मॅजिक अभ्यासके विषयी माहिती जाणून घेत मॅजिकचे व्यवस्थापन, मॅजिक परिवारामार्फत राबवण्यात येणारे विविध उपक्रम, मॅजिकची फलनिष्पत्ती याची माहिती जाणून घेतली आणि मॅजिक उपक्रमाला ५ हजार रुपयाची आर्थिक मदत केली. यावेळी ब्राईटएज फाउंडेशनचे अध्यक्ष श्रीकांत एकुडे, साहस उपक्रमाचे संयोजक विलास चौधरी आणि मॅजिकचे विद्यार्थी उपस्थित होते.

## ग्रामपंचायत कोसरसार तंटामुक्त अध्यक्ष पदी नितीन मायकरकर

**वरोरा । प्रतिनिधी**

महात्मा गांधी तंटामुक्त अध्यक्ष पदी नितीन मायकरकर यांची सहाव्यांदा झाली निवड.ग्रामपंचायत कोसरसार येथील ग्रामसभेचे आयोजन २५ ऑगस्ट ला करण्यात आली.ग्रामसभा आयोजित करण्यात आली त्यात ग्रामपंचायत चे सचिव कावळकर यांनी आपले प्रस्तावाचे अभिवाचन करून ग्रामसभेच्या अध्यक्ष पदी सरपंच गणेश मडावी यांची नियुक्ती करून सभेच्या कामकाजास सुरवात करून विविध विषय ग्रामसभेत मांडण्यात आले.

नागरिकांना विविध योजनाची माहिती देण्यात आली त्यात प्रामुख्याने मोदी घरकुल योजना, शेळी शेड, कुकूटपालन सेड, गुरासाठी सेड अश्या बऱ्याच विषयावर सभेत मार्गदर्शन करण्यात आले. गावातील तंटे हे गावात सुटायला पाहिजे या साठी तंटामुक्त समितीची स्थापना दरवर्षी करण्यात येते त्या साठी सभेत उपस्थित असलेल्या नागरिकांमधून एका सदस्यां ची निवड हे अध्यक्ष मनून सभेचे अध्यक्ष हे तंटामुक्त अध्यक्षाची निवड करत असतात. मागील पाच वर्ष नितीन मायकरकर हे तंटामुक्ती चे अध्यक्ष होते. त्यांनी अनेक प्रकरणाचा निपटारा केला त्यामुळेच पुन्हा सहाव्यांदा नागरिकांनी त्यांच्या नावाला पसंती देऊन अध्यक्ष पदी विराजमान केले. सहाव्यांदा निवड झाल्यामुळे सर्व स्तरावरून अभिनंदन होत आहे ग्रामसभेसाठी सरपंच गणेश मडावी ,सचिव कावळकर, उपसरपंच अमित बहादुरे, नवनियुक्त पोलीस पाटील ऋषाली सांगोळले ,ग्रामपंचायत सदस्य तसेच गावातील नागरिकाची मोठ्या संख्येत उपस्थिती होती.



## गोंडपिपरी पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी राजू झाडे तर सचिव पदी प्रसेनजीत डोंगरे

**गोंडपिपरी । प्रतिनिधी**

गोंडपिपरी तालुका पत्रकार संघाची कार्यकारणी नव्याने गठीत करण्यात आली असून अध्यक्षपदी राजू झाडे तर सचिवपदी प्रसंगी डोंगरे,उपाध्यक्षपदी बाबुराव बोंडे यांची अविरोध निवड करण्यात आली.

गोंडपिपरी पत्रकार संघाचा एक वर्षाचा कार्यकाळ संपुष्टात आल्याने नव्याने संघाची कार्यकारणी दि(२७) रविवारी संदीप हॉटेल येथे आयोजित बैठकीत गठित करण्यात आली सर्वानुमते अध्यक्षपदी राजू झाडे,उपाध्यक्षपदी बाबुराव बोंडे, सचिव पदी प्रसेनजीत डोंगरे,सहसचिवपदी नितीन पुढटवार, कोषाध्यक्षपदी प्रमोद



दुर्गे यांची निवड करण्यात आली.यावेळी जेष्ठ पत्रकार बाळू निमगडे,पत्रकार संघाचे सदस्य सुरज माडुरवार,समीर निमगडे, चंद्रजीत गव्हारे,रुपेश निमसरकर, प्रशांत कोसनकर यांची उपस्थिती होती.निवडीनंतर नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा सत्कार करीत पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा देण्यात आल्या

## वरोऱ्यात सुभेदार सिनेमाचे पोस्टर लॉंच !

**वरोरा । प्रतिनिधी**

कोणताही चित्रपट जोपर्यंत चित्रपटगृहात प्रत्यक्ष प्रदर्शित होत नाही, तोपर्यंत तो वेगवेगळ्या माध्यमातून प्रेक्षकांशी संवाद साधत असतो. यामध्ये अर्थात चित्रपटाच्या संगीताचा सर्वात मोठा वाटा असला तरी त्याची पहिली ओळख आपल्याला होते ती पोस्टरपासून. मुंबई ,पुणे तसेच इतर मोठ्या शहरांमध्ये मोठ्या थाटामाटात सिनेमाचे पोस्टर लॉंच केले जाते. त्याच धर्तीवर २५ ऑगस्ट ला प्रदर्शित होणाऱ्या सुभेदार सिनेमाचे निर्माते राजवारसा प्रॉडक्शन चे संचालक अनिल नारायण वरखडे यांनी २३ ऑगस्ट रोज बुधवारला वरोरा येथील गोठी मेडिकलच्या इमारतीवर मोठ्या थाटामाटात विविध मान्यवरांच्या हस्ते सुभेदार सिनेमाचे पोस्टर लॉंच करण्यात आले .

### शिवगर्जने सह चित्रपटातील गीतांनी निनादला परिसर





चंद्रपुर जिल्ह्यात प्रथमच पोस्टर लॉंचिंग सोहळा आयोजित करण्यात आला होता. लोकशिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रा श्रीकांत पाटील, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते केशव ठमके, प्रसिद्ध व्यापारी नरेंद्र डोंगरवार, धीरज गोठी, विद्या भारती चे माजी पदाधिकारी अविनाश नेवासकर, विश्र् हिंदू परिषदेचे जिल्हा संपर्क प्रमुख, पराग दवंडे, पारस उद्योग समूहाचे संचालक अमोल मुथा, डॉ. सागर वझे, प्रकाश नाहर, शिवसेना (उ. बा ठा) जिल्हा प्रमुख , डॉ. हेमंत खापणे आदींच्या उपस्थितीत फलकाचे अनावरण करण्यात आले.

या प्रसंगाचे ड्रोन ने चित्रीकरण करून फुलांचा वर्षाव करताच तरुणांनी एकच जल्लोष केला. याप्रसंगी बोलताना प्रा श्रीकांत पाटील यांनी शिवचरित्रातील उदाहरणांचा दाखला देत मालुसरे घराण्याचे योगदान अधोरेखित केले. छत्रपती शिवरायांनी हिंदवी स्वराज्याची पताका आसमंतात फडकविली. आपल्या घरातील विवाह सोहळ्याची चिंता न करता तानाजी मालुसरे हे लढले. त्यांचे हे हौतात्म इतिहास कधीही विसरणार नाही से ते म्हणाले. वरोरा शहरातील अनिल नारायणराव वरखडे या तरुण निर्मात्याने संस्कारमय चित्रपटात ची निर्मिती करण्याचा केलेला संकल्प हा अभिनंदनीय असल्याचे ते यावेळी म्हणाले.वरोरा शहरवासीयांसाठी ही अनोखी भेंट या चित्रपटाचे निर्माते अनिल नारायणराव वरखडे यांनी देत सुभेदार चित्रपटामागील भूमिका स्पष्ट केली. वीर सुभेदार तान्हाजी मालुसरे आणि सिंहगड युद्ध यावर हा चित्रपट आधारीत असल्याचे सांगत शिवराज अष्टकातील हे पाचवे चित्र पुष्प रसिकांनी आवर्जून पाहावे असे ते म्हणाले.याप्रसंगी अनिल वरखडे यांचा शहरवासीयांतर्फे शॉल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ प्रशांत खुळे यांनी केले. सुभेदार चित्रपटातील गीतांनी परिसर निनादला होता. तरुण आणि रसिकांची मोठी उपस्थिती याप्रसंगी होती. २५ ऑगस्ट ला हा चित्रपट महाराष्ट्रास ५ देशांमध्ये प्रदर्शित होतो आहे . सदर चित्रपट शहरातली सत्यम सिनेमा मध्ये ही प्रदर्शित होणार असून वरोराकरांनी आपल्या कुटुंबासह हा चित्रपट बघावा असे आवाहन अनिल वरखडे यांनी यावेळी केले.

# केंद्रेकर शिफारशीचे अंतरंग

शेती संकटाबाबत मराठवाडा विभागाचे तत्कालीन विभागीय आयुक्त सुनील केंद्रेकर यांनी मेहनत घेऊन एक अहवाल राज्य सरकारला सादर केला आहे. एकट्या मराठवाड्यात प्रतिवर्षी सरासरी ८५३ शेतकरी आत्महत्या करत असून राज्यात दरवर्षी २,६५७ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे भीषण वास्तव अहवालात अधोरेखित करण्यात आले आहे. शेतकऱ्यांना हंगामपूर्व पिक लागवडीसाठी एकरी १० हजार रुपये अनुदान देता येईल का यासाठीचा प्रस्तावही केंद्रेकरांनी सादर केला आहे. सदरच्या प्रस्तावातील शिफारसी समजून न घेताच काही संघटनांनी या शिफारशींचे जोरदार समर्थन सुरु केले आहे. केंद्रेकरांच्या प्रस्तावातील शिफारशीचे अंतरंग या पार्श्वभूमीवर नीट समजून घेण्याची आवश्यकता आहे.

**संभाव्य दायित्व**

प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे राज्याचे एकूण भौगोलिक क्षेत्र ३०७.५८ लाख हेक्टर असून, त्यापैकी लागवडी खालील सरासरी क्षेत्र २०४.६६ लाख हेक्टर आहे. खरीप हंगामातील उस पिकासह सरासरी लागवड क्षेत्र १५२.९७ लाख हेक्टर, रब्बी क्षेत्र ५३.९८ लाख हेक्टर, उन्हाळी क्षेत्र ३.५० लाख हेक्टर व फळबाग क्षेत्र २१.१९ लाख हेक्टर आहे. उन्हाळी क्षेत्र व फळबाग क्षेत्र वगळून केवळ खरीप व रब्बी हंगामाकरिता शेतकऱ्यांना प्रतिएकरी १० हजार रुपये अनुदान द्यावयाचे झाल्यास सरकारला यासाठी दर वर्षी ५१,७३७ कोटी रुपये खर्च करावे लागतील. राज्याची आर्थिक परिस्थिती पहाता ही फार मोठी रक्कम आहे. प्रस्तावात ही रक्कम उभी करण्यासाठी सध्याच्या अनेक योजना बंद करण्याची शिफारस केली गेली आहे.



डॉ. अजित नवले
केंद्रीय सहसचिव
अखिल भारतीय किसान सभा

**कृषी व शेतकरी विकास योजना**

कृषी विभागाच्या सहभागाने केंद्राचे ६० व राज्याचे ४० टक्के अनुदान असलेल्या राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान, राष्ट्रीय खाद्य तेल अभियान, राष्ट्रीय अन्नसुरक्षा अभियान (कापूस, उस), राष्ट्रीय शाश्वत शेती अभियान, कृषी उन्नत योजना (आत्मा), परंपरागत कृषी विकास योजना, कृषी अभियांत्रिकीकरण उपाभियान, बियाणे व लागवड साहित्य उपअभियान, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना, एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान, प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग, राष्ट्रीय कृषी विकास योजना, शिवाय राज्य सरकारच्या १०० टक्के अनुदान सहभागाच्या पिकांवरील कीडरोग सर्वेक्षण व सल्ला प्रकल्प, सेंद्रिय शेती-विषमुक्त शेती योजना, समूहगट शेती योजना, कृषी यांत्रिकीकरण योजना, भाव फरकाची रक्कम बिजोत्पादक शेतकऱ्यांना देणे, भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना, आदिवासी कुटुंब परसबाग फळझाडे व भाजीपाला लागवड योजना, शाश्वत कृषी सिंचन योजना व कृषी व अन्न प्रक्रिया योजना या सर्व योजना बंद कराव्यात व या सर्व योजनांवर खर्च होणारी केंद्राची ४९०.३८ कोटी आणि राज्याची ८४१.८९ कोटी अशी एकूण १,३३२.२७ कोटी रुपये रक्कम १० हजार रुपये अनुदान योजनेकडे वळवावी अशी शिफारस करण्यात आली आहे.

**विमा योजना**

शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्तीमध्ये होणाऱ्या नुकसानीपासून संरक्षण मिळावे यासाठी केंद्र व राज्य सरकारच्या वतीने विविध योजना राबविल्या जातात. प्रधानमंत्री पिक विमा योजना, प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजना, परंपरागत कृषी विकास योजना (सेंद्रिय शेती), शेतकरी उत्पन्न संरक्षण योजना व नारळ पाम विमा योजना या योजनांवर शेतकरी विमा हप्त्यापोटी सरासरी प्रतिवर्षी ५६८.८४ कोटी व केंद्र आणि राज्य विमा हप्त्यापोटी ४,१५३.९६ कोटी असे एकूण ४,७२२.८० कोटी रुपये खर्च झाले आहेत. शेतकऱ्यांना यातून केवळ सरासरी ३,१८५.५९ कोटी रुपये नुकसानभरपाई मिळाली आहे. एकूण विमा हप्त्याच्या तुलनेत नुकसानभरपाईची रक्कम १,५३७.२१ कोटीने कमी आहे. नुकसानभरपायीचे हे प्रमाण ६८ टक्के एवढेच आहे. अशा परिस्थितीत या सर्व योजना बंद कराव्यात व यातून सरकारचे वाचणारे ४,१५३.९६ कोटी रुपये १० हजार रुपये अनुदान योजनेकडे वळवावेत अशी शिफारस करण्यात आली आहे.

**कर्ज व्याज सवलत**

शेतकऱ्यांना स्वस्तात कर्ज उपलब्ध व्हावे यासाठी राज्य व केंद्र सरकारकडून शेती कर्जावरील व्याज माफ केले जाते. राज्य सरकारच्या सहकार विभागामार्फत डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजना राबविली जाते. या अंतर्गत वार्षिक सरासरी ११२ कोटी रुपये खर्च होतो. राज्य सरकारच्या समाजकल्याण विभागामार्फत अनुसूचित जातीच्या शेतकऱ्यांना व्याज सवलत योजना राबविली जाते. या अंतर्गत वार्षिक सरासरी ४.३० कोटी रुपये खर्च होतो. सदरच्या या दोन्ही योजना बंद करून वाचणारी ११६.३० कोटी रुपये रक्कम १० हजार रुपये अनुदान योजनेकडे वळवावी अशी शिफारस करण्यात आली आहे.

**अव्यवहार्यता**

अतिवृष्टी, ढगफुटी, पूर, वादळ, दुष्काळ, किडींचा प्रादुर्भाव यामुळे शेतकऱ्यांना मोठे नुकसान होते. महसूल विभागामार्फत अशा आपत्तींमध्ये शेतकऱ्यांना शेतजमीन व शेतपिकांच्या नुकसानीपोटी सरासरी प्रतिवर्षी ५,३४८ कोटी रुपये मदत देण्यात आली आहे. शेतकऱ्यांना यापुढे अशी मदत न देता हे ५,३४८ कोटी रुपये, शिवाय कंपनी कायदा २०१, कलम १३५ नुसार खाजगी कंपन्यांना देय असलेल्या निव्वळ उत्पन्नाच्या २ % सामाजिक दायित्व फंडाचे सरासरी ३,०२७ कोटी रुपये, पी.एम.सन्मान योजनेचे ५,८६५ कोटी रुपये व खरेदी विक्री दस्त नोंदींचे मुद्रांक शुल्क वाढवून उपलब्ध होणारे ३०० कोटी रुपये, १० हजार रुपये अनुदान योजनेकडे वळवावेत अशी शिफारस करण्यात आली आहे. वरील सर्व उपायांमुळे योजनेसाठी २०,१४२ कोटी रुपये उपलब्ध होतील.



तरीही योजनेसाठी आवश्यक असलेले ५१,७३७ कोटी रुपये पूर्ण करण्यासाठी आणखी ३१,५९५ कोटी रुपये लागतील. प्रस्तावात यासाठी प्रसंगी कृषी विभागाच्या कर्मचाऱ्यांची संख्या कमी करून वाचणारी रक्कम योजनेसाठी वापरण्याची सूचना केली आहे. मात्र तरीही यातून ३१,५९५ कोटी रुपये जमा होऊ शकणार नाहीत हे उघड आहे.

**मुलभूत सुधारणा**

केंद्रेकर काय सुचवीत आहेत हे समजून न घेताच त्यांची शिफारस तेलंगना योजनेसारखी आहे म्हणून तिचे समर्थन काही संघटना करत आहेत. आजारापेक्षा उपाय किती भयानक आहेत हेच यातून लक्षात येते आहे. सिंचन, रेशन, पिक विमा, आपत्तीमध्ये मदत, यांत्रिकीकरण, आधारभाव, व्याज सवलत हे सारे सारे बंद करून, प्रसंगी कृषी विभाग आणखी कमजोर करून, केवळ १० हजार रुपयाने कृषी संकट संपणार नाही ही बाब या पार्श्वभूमीवर लक्षात घेण्याची आवश्यकता आहे. शेतकरी केंद्री मुलभूत शेती सुधारणांना बगल देऊन तसेच, शेतीमालाला उत्पादन खर्चावर आधारित दीडपट हमीभावाची स्वामिनाथन आयोगाची मागणी अडगळीत टाकून कृषी संकटावर मात करता येणार नाही, हे ही येथे अधोरेखित करण्याची आवश्यकता आहे.

**कृषी आरीष्टाचे स्वरूप**

कृषी आरीष्टातून शेती आणि शेतकऱ्यांना बाहेर काढण्यासाठी नक्की कोणता उपाय 'रामबाण' आहे याची चर्चा करण्यापूर्वी कृषी आरीष्टाचे नक्की स्वरूप काय आहे ? याबाबत चर्चा झाली पाहिजे. देशात स्वातंत्र्य पूर्व काळापासूनच शेती तोट्याचा व्यवसाय राहिली आहे. असे असले तरी शेती व शेतकरी अधिक तोट्यात गेले ते मुख्यत: १९९१ नंतर आपण स्वीकारलेल्या नवउदार धोरणांमुळे. १९९१ पूर्वीच्या व नंतरच्या शेतकरी आत्महत्यांच्या आकडेवारीकडे नजर टाकली की ही बाब लगेच स्पष्ट होते. १९९१ नंतर शेतकरी आत्महत्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढलेली दिसते. नवउदार धोरणांचा भाग म्हणून १९९१ नंतर कृषी निविष्टांचा बाजार व व्यापार खुला केला गेला. बियाणे, खते, वीज, सिंचन, वाहतूक, विक्री व्यवस्था, कर्ज, संशोधन यासाठीची अनुदाने टप्याटप्याने कमी करण्यात आली. या सर्व बाबी नफा कमविण्यासाठी खाजगी कंपन्यांच्या हवाली करण्यात आल्या. परिणामी शेतीमालाचा उत्पादन खर्च तीव्र गतीने वाढत गेला. गरजेसाठी नव्हे तर बाजारासाठी उत्पादन घेण्याच्या 'उच्च लागत मूल्य' पिकपद्धतीमुळे शेतीमालाचा उत्पादन खर्च शेतकऱ्यांच्या आवाक्या बाहेर गेला. दुसऱ्या बाजूला 'अनुदानांनी' स्वस्त झालेल्या परकीय शेतीमालाची अमर्याद आयात सुरु झाली. कंपन्यांना स्वस्तात कच्चा माल उपलब्ध व्हावा यासाठी महागाई नियंत्रणाच्या नावाखाली देशी शेतीमालावर वारंवार निर्यातबंदी लादली गेली. परिणामी शेतीमालाचे भाव पडत राहिले. वाढता उत्पादन खर्च, सरकार व समाजाचा घटत गेलेला पाठींबा, नैसर्गिक आपत्तीत संरक्षणाचा अभाव व शेतीमालाच्या विक्रीतून मिळणारे नगण्य उत्पन्न, अशा पेचात शेती आणि शेतकरी अडकत गेले. कर्जबाजारी झाले. नैराश्याने घेरले जाऊ लागले. आत्महत्या करू लागले. हे आहे शेती आरीष्टाचे खरे स्वरूप. कृषी आरीष्टाचे हे स्वरूप पाहता, शेतीमालाचा उत्पादन खर्च कमी करून शेतीमालाचे किफायतशीर भाव शेतकऱ्यांना मिळाल्याशिवाय या पेचातून शेतकऱ्यांची व देशाची सुटका होऊ शकणार नाही.

**मूळ उपचाराकडे अक्षम्य दुर्लक्ष**

शेतीमालाचा उत्पादन खर्च कमी करून शेतकऱ्यांना शेतीमालाला किफायतशीर दर मिळतील हा मुख्य उपाय न करता बरोबर याउलट केले जात आहे. शेतीमालाचा उत्पादन खर्च अमर्याद वेगाने वाढता ठेवण्यात आला आहे. बियाणे, खते, इंधन, वीज, मजुरी, शेती साधने व सेवांचे दर, शेती औजारांचे दर, कर्जाचे व्याज, वेगाने वाढत आहे. शेती उभी करण्यासाठी आवश्यक असलेल्या गोष्टींचे दर कमी करण्यावर देशभर कुणीच ब्र काढायला तयार नाहीत. उलट हे सर्व क्षेत्र शेतकऱ्यांची अमर्याद लुट करण्यासाठी खाजगी कंपन्यांना खुले व नियंत्रणमुक्त करण्यात आले आहे. दुसऱ्या बाजूला शेतीमालाचा बाजार क्रूरपणे शेतकरी विरोधी पद्धतीने 'नियंत्रित' केला जात आहे. प्रत्येक शेतीमालाचे भाव पाडले जात आहेत. टॉमेटो व कांद्याचे दर कशा पद्धतीने पाडले गेले व भाव मिळत नव्हता तेंव्हा शेतकऱ्यांना कसे वाऱ्यावर सोडले गेले हे आपण पाहिले आहे. शेतीमालाच्या बाजाराबरोबरच शेतकऱ्यांना निसर्गाचा लहरीपणा व हवामान बदलांमुळे वाढत असलेल्या नैसर्गिक आपत्तींचा वारंवार सामना करावा लागतो आहे. पिक विमा, मालमत्ता विमा, आरोग्य विमा व जीवन विम्याचे संरक्षण देऊन अशा आपत्तींमध्ये शेतकऱ्यांना दिलासा देता येणे शक्य आहे. मात्र यासाठी लागणारी इच्छाशक्ती दाखविली जात नाही. उलट कृषी आरीष्टावर मुलभूत उपाय न करता, हंगामपूर्व १० हजार अनुदान किंवा किसान सन्मान सारखे उपाय हेच 'रामबाण' असल्याचे रुजविले जात आहे. कृषी निविष्टांची महागाई २० हजाराने वाढवायची आणि शेतकऱ्यांना १० हजार रुपये निविष्टा खरेदीसाठी द्यायचे व दुसरीकडे शेतीमालाचे दर पाडून दिलेले १० हजार पुन्हा दाम दुपट्टीने काढून घ्यायचे, असे या उपायाचे स्वरूप आहे.

**उत्पादन खर्च**

पिक उत्पादन खर्चाबाबत १० हजार अनुदान प्रस्तावात भाष्य करताना केंद्रेकर म्हणतात, सर्वसाधारणपणे नगदी पिके जसे कापूस, उस, हळद इत्यादी पिकांच्या लागवडीसाठी प्रति एकर पूर्व मशागत, लागवड किंवा पेरणी, आंतर मशागत, पिक संरक्षण, पॅकींग, वाहतूक, साठवणूक, पणन इत्यादीसाठी ४५,०००/- रुपये खर्च येतो. तृणधान्य वर्गीय पिकांसाठी ३०,०००/- व कडधान्य आणि तेलबिया वर्गीय पिकांसाठी २६,०००/- रुपये खर्च येतो. येणारा हा खर्च व वाढती महागाई लक्षात घेता शेतकऱ्यांना खरीप व रब्बी हंगामात पिके उभी करण्यासाठी १० हजाराचे रोख अनुदान द्यावे असे ते मांडतात. मात्र असे करताना, मागील लेखात वर्णन केलेल्या अनेकानेक पूर्वीच्या योजना व अनुदान बंद करण्याची शिफारस ते करतात. देतानाच दिलेले काढून घ्यायचा हा प्रकार आहे. शिवाय यासाठी विचारात घेतलेला उत्पादन खर्च कशाच्या आधारे काढला ? हाही मोठा प्रश्न आहे. प्रत्यक्षात नमूद केलेल्या खर्चापेक्षा वास्तव उत्पादन खर्च नक्कीच खूप मोठा आहे.

**सर्वंकष दृष्टीकोन**

कृषी आरीष्टाचे खरे स्वरूप व भारतीय शेतीचे विशिष्ट 'वास्तव' लक्षात घेऊन स्वामिनाथन आयोगाने फार विचारपूर्वक काही मुलभूत मुद्दे उपस्थित केले आहेत. शेतकऱ्यांची तुटपुंज्या रोख अनुदानावर बोळवण करून त्यांना कायमचे मिंधे लाभार्थी बनविण्याऐवजी त्यांना त्यांच्या घामाचे रास्त दाम देण्यावर स्वामिनाथन आयोगाने भर दिला आहे. शेतीकडे एकांगी दृष्टिकोनातून न पाहता शेती व शेतकऱ्यांच्या सर्वंकष, शाश्वत व गतिमान विकासाचा सर्वंकष दृष्टीकोन स्वीकारण्यावर स्वामिनाथन आयोगाने भर दिला आहे. भारतीय शेतीची विशिष्ट वैशिष्ट्ये लक्षात घेऊन आयोगाने पिके व जनावरे यांच्या एकात्म संगोपनाची निकड व्यक्त केली आहे. शेतीमाल प्रक्रिया व मूल्यवर्धनाची आवश्यकता नेटकेपणाने सांगितली आहे. शेतीचा विकास किती लाख टन शेतीमालाचे उत्पादन झाले यावरून न ठरविता, शेतीत राबणारांचे 'उत्पन्न' किती वाढले याआधारे ठरविण्याचा आग्रह धरला आहे. खेदाची बाब अशी की कृषी आरीष्ट निवारणाचा असा समग्र दृष्टीकोन समोर ठेवणाऱ्या स्वामिनाथन आयोगाला बाजूला सारण्यासाठी रोज नवे प्रस्ताव, नव्या उथळ योजना आणि नवे कृषी कायदे चर्चेत आणले जात आहेत. मतांची बेगमी गोळा करण्यासाठी 'लाभार्थ्यांच्या याद्या' कशा वाढतील यानुसार योजना आखल्या जात आहेत. भारतीय शेतकऱ्यांचे हे मोठेच दुर्दैव आहे.

---

**मदर टेरेसा ह्या एक थोर मानवतावादी समाजसेविका होत्या. त्यांनी आपल्या जीवनाचे सर्वस्व साधून काही विचार व्यक्त केले आहे. एकटेपणा सर्वात मोठी गरीबी आहे. प्रेम हे प्रत्येक ऋतूत येणारे फळ आहे आणि प्रत्येक व्यक्ती याला प्राप्त करू शकतो. शांतता ही चेहऱ्यावरील एका हास्याने सुरू होते. लहान सहान गोष्टी मध्ये इमानदार रहा, कारण याच्याने तुमची शक्ती वाढते. शिस्त ही ध्येय आणि उपलब्धते मधील पूल आहे, त्याची जपवणुक करण्याची गरज आहे.**

# मानवता हीच ईश्वर सेवा
# मदर टेरेसा

**मदर तेरेसा या लहानपणापासून अतिशय सुंदर, अभ्यासू व मेहनती होत्या. अभ्यासासोबत त्यांना गाणे गाण्याचा देखील छंद होता. त्यांच्या आईने लहानपणापासून त्यांना चांगली शिकवण दिली होती. त्यांच्या आईचे म्हणणे होते कि, जे काही मिळेल ते सर्वांनी वाटून खावे, स्वत:साठी तर सर्वच जगतात, पण दुसऱ्यांच्या सेवेसाठी जे आपले आयुष्य पणाला लावतात ते खरे महान असतात. त्या भारतात ख्रिश्चन धर्माचा प्रसार करण्यासाठी आल्या, त्यांनी अनेकांना तसा बाप्तिस्मा दिला, अशा असंख्य वार्ता त्या काळात उठत राहिल्या, पण त्या सगळ्या तथ्यहीन होत्या. त्या एकदा अशाच टीकेला त्रासून म्हणाल्या, की होय, मी त्यांचे 'धर्मांतर' घडवते. हिंदूंना अधिक चांगले हिंदू बना, मुस्लिमांना मी अधिक चांगले मुस्लिम व्हा आणि ख्रिश्चनांकडे अधिक चांगले ख्रिश्चन बना असा आग्रह धरते.**



मदर टेरेसा धाडसीही होत्या. बैरूतला वेढा पडलेला असताना त्यांनी इ.स. १९८२ मध्ये पॅलेस्टेनियन बंडखोर आणि इस्रायली सैनिक यांच्यात तात्पुरता समझोता घडवून आणून रेडक्रॉसच्या मदतीने ३७ लहान मुलांची सुटका घडवून आणली. त्या स्वतः युद्धभूमीवर हिंडल्या. कम्युनिस्ट देशांमध्ये 'मिशनरीज ऑफ चॅरिटी'चा प्रसार केला. इथिओपिया मधल्या भुकेलेल्यांना त्यांनी आधार दिला. त्या तिथे गेल्या, ज्या काळात चेर्नोबिलच्या किरणोत्सर्गाची घटना घडली तेव्हाही आपल्याला त्याचा त्रास होईल किंवा नाही याची चिंता करत बसण्यापेक्षा त्यांनी तिथे जाऊन ज्यांना तो त्रास झाला त्यांना आधार दिला. त्यांच्या मनात अपंग, पददलित, शोषित, पीडित, दीनदुबळे इत्यादींची सेवा करावी, हे विचार येत. किंबहुना हीच ईशसेवा होय, असे विचार त्यांच्यात दृढमूल झाले. एकदा दार्जिलिंगला जात असताना तू गरिबांच्या सेवेला लाग असा जणू दैवी संदेशच त्यांना मिळाला. तेव्हा शैक्षणिक जबाबदारीतून मुक्त होऊन त्यांनी केवळ निराश्रित व दीनदुबळे यांच्या सेवेस आमरण वाहून घेतले. त्या काळात कोलकत्यात प्लेग व कुष्ठरोगाची साथ आली. या रोग्याची सेवा करण्याची जवाबदारी मदर टेरेसा यांनी घेतली. गरीबांसाठी तर मदर तेरेसा देवदूत होत्या. नंतरच्या काळात त्यांनी आपली संस्था भारताबाहेर पोहचवण्यासाठी भारत सरकार तर्फे परवानगी मिळवली. आज च्या काळात १०० पेक्षा जास्त देशात त्यांच्या मिशनरी सुरू आहेत. त्याच्या निस्वार्थभावामुळे लोकांना देखील त्या खूप प्रिय होत्या. जागतिक कीर्ती मिळविलेल्या एक असामान्य व्यक्ति, एक थोर समाजसेविका म्हणून, मदर टेरेसा हया महिलेचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. गोरगरीब, निराश्रीत, अनाथ, अपंग, अशा लोकांना आपले समजून जो प्रेमाने, मनोभावे त्यांची सेवा करतो, तोच खरा साधु होय' असे तुकाराम महाराजांनी एका अभंगात म्हटले आहे. ते काही खोटे नाही, त्याची अनुभूती आपणांस या वाक्यात सापडते. या दृष्टिने विचार केला, तर मदर टेरेसा यांना खरोखरच संत म्हणणे योग्य होईल. कारण त्यांचे पाऊल वाटत्याच दिशेने होते, म्हणुनच त्या अजरामर झाल्यात. आत्यंतिक प्रेम करणारं मन कसं निरागस असते आणि जगाच्या व्यवहारिक चौकटी पासुनही किती अनभिज्ञ असते ते आपल्याला त्यांच्यात प्रकर्षाने जाणवते. खरं प्रेम तर जात, धर्म, भाषा, प्रदेश हया पलीकडे असते. प्रेमाला फक्त दयेची भाषा कळते या भाषेला लिपी नसते. स्पष्टगंध हयातूनच प्रेमाची अभिव्यक्ति होते.प्रत्येकाला दिलासा, धीर, आधार देवून दु:खितांचे अश्रू पुसले. म्हणूनच त्यांनी स्थापन केलेल्या निर्मळहृदय, शिशुभवन, महारोगी सेवा केंद्र ह्या संस्थेतील प्रत्येक व्यक्तीला मदर टेरेसा आई प्रमाणेच वाटत होत्या. म्हणुन त्यांना सार्थ अभिमान होता, त्यांच्या सहकारी भगिनी रोग्यांची, लहान मुलांची आस्थेवाईक मायेने सेवा करीत होत्या. कोलकातातील काली मातेच्या मंदिरातील धर्मशाळेत १९५२ साली मदर टेरेसा यांनी प्रथम निर्मळहृदय' ही संस्था उघडली. तिथे सर्व जाती धर्माचे दु:खी, रोगी, वृध्द, अपंग लोक आश्रय घेतात. त्यांच्या या उदात्त कार्याच्या शाखाआपल्या देशातच नव्हेतर परदेशातही पसरलेल्या आहेत, ही भुषणावह बाब आहे. भारतात व इतर देशांत संस्थेने चालविलेल्या ९८ शाळा, ४२५ फिरती रूग्णालये, १०२ कुष्ठरोग उपचार केंद्रे, २८ शिशुभवने, ४८ अनाथालये व ६२ आश्रमगृहे आहेत. महाराष्ट्रात पुणे, औरंगाबाद आणि मुंबई या ठिकाणीही सेवा केंद्रे आहेत. १९४६ मध्ये त्यांनी गरीब, बीमार आणि असहाय्यांची सेवा सुरू केली. ७ ऑक्टोंबर १९५० मध्ये त्यांना चॅरिटी साठी मिशनरी बनवण्याची परवानगी मिळाली. सुरुवातीला या संस्थेत १२ कर्मचारी नन होते. पण आताच्या काळात ४००० पेक्षा जास्त नन या संस्थेत आहेत. या संस्थेद्वारे अनाथाश्रम, नर्सिंग होम, वृद्धाश्रम या सारख्या सेवा संस्था सुरू करण्यात आल्या.मदर टेरेसा यांच्या सेवाकार्याची दखल घेऊन १९७९ चे शांततेचे नोबेल पारितोषिक तिला दिले. तिला ४३ राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय मानसन्मान लाभले. मागसाय-साय पारितोषिक १९६२, पोपचे शांतता पारितोषिक (१९७१), नेहरू पुरस्कार (१९७२), पद्मश्री देशिकोत्तमा, नॉर्वे लोक पारितोषिक (१९७९), भारतरत्न (१९८०) इ. महत्त्वाची व मानाची आहेत. विविध मान्यवर विद्यापीठांनी त्यांना डॉक्टरेट ही सन्मान्य पदवीही दिली आहे. ऑर्डर ऑफ मेरिट हा अत्युच्च ब्रिटिश पुरस्कार राणी दुसरी एलिझाबेथ हिने २४ नोव्हेंबर १९८३ रोजी त्यांच्या मानवतेच्या श्रेष्ठ सेवेबद्दल दिला. मदर टेरेसाचे विचार स्फुटलेखांद्वारे ए गिफ्ट फॉर गॉड (१९७५) या पुस्तकात संकलित केले आहेत. मदर तेरेसा ह्यांनी संतपदाची कसोटी असलेली दुसऱ्या चमत्काराची अट पूर्ण केल्यामुळे त्यांना संतपद देण्याचा सोहळा डिसेंबर २०१५ मध्ये झाला. संत ही उपाधी ९ सप्टेंबर २०१६ ला लालवेटिकन सिटी मध्ये पोप फ्रांसिस ने त्यांना संतची उपाधिने विभूषित केले.एवढे पुरस्कार, मान-सम्मान मिळूनही त्या थोडयाही बदललेल्या नाहीत, किंवा कार्य सोडून त्यांनी आराम घेतलेला नाही. परमेश्वरावर त्यांची नितांत श्रध्दा होती. म्हणूनच त्यांनी उभारलेल्या या महान कार्याला कधीही काहीही कमी पडू दिले नाही. आज जगात ठिकठिकाणी त्यांच्या कर्तृव्यदक्षते मुळेच कार्याच्या शाखा उघडलेल्या आहेत. पण असे असले तरी भारत देश आणि त्यातील कोलकाता हे शहर त्यांनी स्वत:चे कार्यक्षेत्र म्हणून निवडलेले होते. ही जणु परमेश्वराचीच मर्जी म्हणावी लागेल. त्या पक्षीय राजकारणा पासुन दुर होत्या, प्रसिध्दीची त्यांना हाव नव्हती. तरीही त्या जगभर प्रसिध्द झाल्या. कारण त्यांना ध्यास होता सेवा करण्याचा. मायेची ती मांगल्यमूर्ती होती आज मदर टेरेसा हे नांव आणि त्यांचे कार्य माहित नाही असा माणूस कोठेही सापडणार नाही. स्वत:च्या सुख-दु:खा पुढे दुसरे काहीही न पाहणाऱ्या जगात दुसऱ्यांचे दु:ख हलके करण्यासाठी सतत परिश्रम करणाऱ्या एक अलौकिक, थोर स्त्रीरत्न होत्या. मदर टेरेसा ही परमेश्वराने भारताला दिलेली एक देणगी आहे. अपंग, वृध्द, अनाथ, रोगी या सर्वांना प्रेम देणारी, प्रेमा स्वरुपा सारखी खरोखरच सर्वांची आई म्हणून ख्याती आहे. उदार अंत:करणा सारख्या व्यक्ति फार क्वचितच जन्माला येतात आणि या साऱ्या जगाला आपल्या कर्तृव्यपरायणाची भूषणावह ठरतात. जे का रंजले गांजले। त्याशी म्हणे जो आपुले। संत तुकाराम जसे रंजल्या गांजलेल्या लोकांना प्रेम देत, त्यापेक्षाही भर भक्कम जिवाची तमा न बाळगता कार्य करणारी मदर टेरेसा ही एक स्त्रीच होती. याचा स्त्रियांनी अभिमान बाळगायला हवा आणि त्यापासुन स्फूर्ति घेऊन काही भरीव कार्य करायला हवे. असा अमुल्य ठेवा संचित करुन त्या आदर्श म्हणून अशा व्यक्तिंना आपण सतत डोळया समोर ठेवून त्यांच्या सारखे कार्य केले पाहिजे आणि एक अमीट असा ठसा उमटविला पाहिजे. ५ सप्टेंबर १९९७ साली त्या इहलोकी निघुन गेल्यात त्यांच्या ११३ व्या जयंती दिनानिमित्त त्यांना भावपूर्ण आदरांजली अर्पण करीत असतांना त्यांच्या पश्चात काही उणीवा राहिल्यास त्या प्रभू येशु पूर्ण करोत एवढीच भगवंता चरणी प्रार्थना.



प्रविण बागडे
नागपूर
भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९

# संस्कारी शिक्षण घेऊन समाजाचे ऋण फेडणारा विद्यार्थी घडावा-पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार

## वरोरा येथील श्रद्धेय अटलबिहारी वाजपेयी ई-अभ्यासिकेचे लोकार्पण







**चंद्रपूर । प्रतिनिधी**

शिक्षण हे केवळ पुस्तकी नव्हे तर संस्कारी असावे. आपण समाजाचे कोणीतरी लागतो, या भावनेतून संस्कारी शिक्षण घेऊन ऋण फेडणारा विद्यार्थी या अभ्यासिकेतून घडावा, अशी अपेक्षा राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केली.

वरोरा येथील श्रद्धेय अटल बिहारी वाजपेयी अभ्यासिकेचे लोकार्पण करताना ते बोलत होते. यावेळी मंचावर नगरपालिकेचे मुख्याधिकारी गजानन भोयर, देवराव भोंगळे, डॉ भगवान गायकवाड, माजी नगराध्यक्ष एहतेशाम अली, श्रीमती जोगी, रमेश राजुरकर आदी उपस्थित होते.श्रद्धेय अटल बिहारी वाजपेयी ई-अभ्यासिकेचे लोकार्पण झाले, असे सुरुवातीला घोषित करून पालकमंत्री श्री मुनगंटीवार म्हणाले, नगरपालिकेने अतिशय चांगले नियोजन करून ही अभ्यासिका उभी केली आहे. रस्ता, पूल या भौतिक सुविधेच्या गोष्टी थोड्या उशिरा तयार झाल्या तरी जास्त फरक पडत नाही, मात्र देशाचे भविष्य घडविणारे विद्यार्थी जेथे तयार होतात, अशा शैक्षणिक सुविधा त्वरित उभ्या करणे आवश्यक आहे. इतर देशात आर्थिक संपन्नता, भौतिक संसाधने आदी गोष्टी मुबलक प्रमाणात असल्या, तरी तेथील जीवन हे सुखी- संपन्नच राहील, याची शाश्वती नाही. मात्र आपला देश, आपला समाज हा कुटुंबवत्सल आहे. हेच संस्कार आपल्याला सुरुवातीपासून मिळाले आहेत. त्यामुळे आजच्या विद्यार्थ्यांना अशा संस्कारी शिक्षणाची गरज आहे. शेवटी देशाच्या गुणसंपन्नतेवरच आनंदाचा इंडेक्स ठरत असतो.पुढे पालकमंत्री म्हणाले, चंद्रपूर हा वाघांचा जिल्हा आहे. त्यामुळे येथील विद्यार्थ्यांनी शिक्षणात वाघासारखाच पराक्रम करावा. राज्याचा मंत्री व या जिल्ह्याचा पालकमंत्री म्हणून चंद्रपूर, बल्लारशा, पोंभुर्णा येथे डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी वाचनालय सुरू करण्यात आले आहे. आपण निर्माण केलेल्या वास्तूमधून प्रशासकीय अधिकारी घडतात, याचा आपल्याला मनापासून आनंद आहे. विद्यार्थ्यांनो, खूप मोठे होऊन या शहराचे तसेच या जिल्ह्याचे नाव रोशन करा, असा सल्लाही त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.कार्यक्रमाचे संचालन प्रा. डॉ .प्रशांत खुळे यांनी केले. यावेळी अभिजित मोटघरे, सूरज पूनवटकर, बाबासाहेब भागडे, आकाश वानखेडे, अमित गुंडावार, ओम मांडवकर, अमित चवले, सुरेश महाजन, सागर वझे, आकाश भागडे यांच्यासह माजी नगरसेवक, विविध संघटनांचे पदाधिकारी नागरिक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

**आपल्या मंत्रिपदाच्या कार्यकाळात जिल्ह्यात एकूण २०५ विकास कामे करण्यात आली आहे. जिल्ह्यात शैक्षणिक सोयीसुविधांना विशेष प्राधान्य असून बाबा आमटे अत्याधुनिक अभ्यासिका तयार करण्यात आली आहे. बल्लारपूर तयार करण्यात आलेल्या सैनिक शाळेतून भविष्यात देशासाठी लष्करी अधिकारी तयार होतील. बल्लारशा येथे सुषमा स्वराज कौशल्य विकास केंद्र, चंद्रपूर – बल्लारपूर मार्गावर ५० एकर मध्ये ५६० कोटी रुपये खर्च करून एस. एन. डी. टी. विद्यापीठाचे उपकेंद्र, चंद्रपुरात गोंडवाना विद्यापीठाचे उपकेंद्र, कृषी महाविद्यालय, चंद्रपूर येथे नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अशा नवनवीन गोष्टी पूर्णत्वास येत आहे. एवढेच नाही तर जिल्हा परिषदेच्या सर्व शाळांमध्ये गुणवत्ता वाढीसाठी विशेष लक्ष देण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत. आज येथे घेतलेली पंचप्राण शपथ हा केवळ कार्यक्रम नाही, तर आपल्या हातून उत्तोमत्तम कार्य घडावे, त्यासाठी हा संकल्प करण्यात आला आहे, असे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी सांगितले.**

**प्रास्ताविकात मुख्याधिकारी गजानन भोयर म्हणाले, या ई – अभ्यासिकेसाठी पालकमंत्री यांनी खनिज विकास निधी अंतर्गत ३ कोटी ६६ लक्ष रुपये मंजूर केले. या अभ्यासिकेमध्ये ३० संगणक, पेंटिंग कक्ष, प्रतिक्षालय, ग्रंथालय स्टोअर रूम आदी उपलब्ध करून देण्यात आले आहे.**

**यावेळी वरोरा येथील शहीद योगेश डाहूले यांची वीरमाता पार्वताबाई आणि वीरपिता वसंतराव डाहूले यांचा ना.सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते शाल व श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला. तत्पूर्वी अभ्यासिकेच्या परिसरात ना.मुनगंटीवार यांनी वृक्षारोपण करून श्रद्धेय अटलबिहारी वाजपेयी यांच्या प्रतिमेला अभिवादन केले.**

# पोलीस दादालोरा खिडकीच्या पुढाकारातून भव्य कृषी व जनजागरण मेळावा संपन्न

## महिलांच्या सुरक्षेसाठी पोलीस विभाग कटिबद्ध-सुदर्शन राठोड

**मुलचेरा । प्रतिनिधी**

तालुक्यातील पोलीस मदत केंद्र बोल्लेपल्ली व पोलीस दादालोरा खिडकीच्या माध्यमातून चंदनवेली येथे भव्य कृषी व जनजागरण मेळाव्याचे आयोजन केले होते.महिलांवर अत्याचार होऊ नये यासाठी कायदा व सुव्यवस्थेची यंत्रणा सक्षम केल्या जात सोबतच शेतकऱ्यांना आत्मनिर्भर बनवण्यासाठी योग्य मार्गदर्शन व सहकार्य पोलीस विभाग करत असून शेतकऱ्यांच्या हितार्थ व महिलांच्या सुरक्षेसाठी पोलीस विभाग कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन पोलीस उपविभागीय अधिकारी सुदर्शन राठोड यांनी जनजागरण,कृषी मेळाव्यात शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना व्यक्त केले.

यावेळी कृषी उपयोगी साहित्य,विविध दाखले वाटप करण्यात आले.यावेळी मंचावर माजी आ. दिपक आत्राम,उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन राठोड,आविस सल्लागार तथा माजी जि.प.सदस्य कारूजी रापंजी,आविस सल्लागार तथा माजी जि.प.सदस्य संजयजी चरडुके,बोल्लेपल्ली पोलीस मदत केंद्राचे प्रभारी अधिकारी मोरे,पोलीस उपनिरीक्षक जंगले,कृषी अधिकारी मडावी,ग्रा प सदस्य रमेश वेलादी,मुख्याध्यापक सुखदेवे,प्रभारी मुख्याध्यापक जि प शाळा तलांडे,माजी सरपंच कालंगा,पोलीस पाटील कुडयेटी,प्रतिष्ठित नागरीक राजेंद्र वैरागडे,खेडचंद्र वैरागडे,भारत राष्ट्र समितीचे नेते,आविस विभागीय अध्यक्ष तथा माजी आमदार दिपक आत्राम यांची उपस्थिती होती.आत्राम यांनी आपल्या मार्गदर्शनात दुर्गम भागात पोलीस विभागाकडून सुरू केलेल्या पोलीस



दादालोरा खिडकीचे प्रसंशा केली.तर या माध्यमातून गोरगरीब जनतेला, शेतकऱ्यांना व युवक युवतींना विविध योजनेचा प्रत्यक्ष लाभ मिळत आहे तसेच शैक्षणिक व इतर दाखल्यासाठी भटकंती न करता एकाच ठिकाणी विविध योजनांचा लाभ मिळत असल्याचे सांगितले.एवढेच नव्हेतर या मेळाव्याच्या निमित्याने पोलीस विभाग व जनतेचा थेट संबंध आल्याने दोघांमध्ये सहकार्याची भावना निर्माण होत असल्याचे म्हटले. या मेळाव्याला पोलिस मदत केंद्र हद्दीतील नागरिक व युवक-युवती मोठ्या संख्येने उपस्थित होते.तर मेळाव्याचे संचलन व आभार प्रदर्शन शिक्षक सोनवणे यांनी केले.

### युवक युवतींसाठी सुसज्ज वाचनालय

**जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक निलोप्पल यांच्या संकल्पनेतून एक गाव एक वाचनालय हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने बोलेपल्ली पोलीस मदत केंद्र अंतर्गत येत असलेल्या चंदनवेली येथे सुसज्ज वाचनालय सुरू करण्यात आली आहे. त्याचे उद्घाटन नुकतेच मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.शालेय विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची व स्पर्धा परीक्षा विषयीची ओढ निर्माण व्हावी तसेच त्यांची उज्वल भविष्याकडे वाटचाल व्हावी यासाठी 'एक गाव एक वाचनालय' हा उपक्रम जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक निलोप्पल यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू करण्यात आले असून सुशिक्षित युवक युतीने तसेच शालेय विद्यार्थ्यांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन उपविभागीय पोलिस अधिकारी सुदर्शन राठोड यांनी केले.**

# विवेकानंद महाविद्यालयात नि:शुल्क नेत्रचिकित्सा शिबिर



**भद्रावती । प्रतिनिधी**

डोळे हा मानवी देहाचा महत्त्वाचा अवयव आहे. त्याची निगा व काळजी आपल्याला स्वतःलाच व्यक्तीशः घ्यावी लागते . डोळ्यांची विशेष काळजी घेतली नाहीतर प्रसंगी जन्मभराचे अंधत्वही येऊ शकते. त्यामुळे सर्वांनी आपल्या डोळ्यांची योग्य पद्धतीने निगा राखली पाहिजे व डोळ्याचे संरक्षण केले पाहिजे असे विचार चंद्रपूर येथील नेत्ररोग तज्ज्ञ डॉ. गुंजन इंगळे (कांबळे) यांनी व्यक्त केले.

त्या स्थानिक विवेकानंद महाविद्यालयात युगपुरुष स्वामी विवेकानंद बहुउद्देशीय पालक - मित्र मंडळ, अ.भा. ग्राहक मंच भद्रावती तथा विवेकानंद महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित डोळ्यांची काळजी व निःशुल्क नेत्र चिकित्सा शिबिरात मार्गदर्शन करताना बोलत होत्या. यावेळी अध्यक्षस्थानी योद्धा संन्याशी स्वामी विवेकानंद बहुउद्देशीय पालक - मित्र मंडळाचे अध्यक्ष पुरुषोत्तम मते, ग्राहक मंचाचे अध्यक्ष वामन नामपल्लीवार, प्राचार्य डॉ. नामदेव उमाटे प्रामुख्याने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे संचालन मंडळाचे सचिव माधव कवरासे प्रास्तविक प्राचार्य डॉ.उमाटे, आभार चंपत आस्वले यांनी केले. यावेळी भद्रावती शहरातील अनेक ज्येष्ठ नागरिक, महिला व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या शिबिरात १३० नेत्र रूग्णांची तपासणी व मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी १४ लोकांचे आयुष्यमान भारत आरोग्य योजनेचे कार्ड काढण्यात आले. विवेकानंद ज्ञानपीठ (कॉन्व्हेंट), वरोरा चे अध्यक्ष पुरुषोत्तम स्वान, सचिव अमन टेमुर्डे यांच्या मार्गदर्शनात संपन्न झालेल्या या शिबिराचे यशस्वीतेसाठी प्रवीण चिमूरकर, वसंत व्हाटे , सुदर्शन तनगुलवार, विठ्ठल मांडवकर, अण्णाजी कुटेमाटे, डॉ.रमेश पारेलवार, प्रा.अमोल ठाकरे, डॉ.उत्तम घोसरे, श्र्वेता कांचर्लावार, वैशाली सुर्यवंशी, राजेश यादव,डॉ यशवंत घुमे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# अतिक्रमणामुळे रोज होते वाहतुकीची कोंडी

**कोरपना । प्रतिनिधी**

शिवाजी चौक ते ज्योतिबा फुले व्यापार संकुलपर्यंत मुख्य रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या अतिक्रमणामुळे सतत वाहतुकीची कोंडी होत असते. सदर अतिक्रमण तात्काळ हटविण्याची मागणी गडचांदूर शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव धनंजय गोरे यांनी उपविभागीय कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग, गडचांदूर व नगरपरिषदेकडे निवेदनाद्वारे केली आहे.

शिवाजी चौक ते ज्योतिबा फुले व्यापार संकुलाच्या मधोमध गडचांदूर शिक्षण प्रसारक मंडळ, गडचांदूर संचालित महात्मा गांधी विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालय, महात्मा गांधी विज्ञान महाविद्यालय, महात्मा गांधी स्कॉलर्स अकॅडमी, महात्मा गांधी विद्यामंदिर अशा विविध शाळा असून या शाळेची एकूण विद्यार्थी संख्या ४ हजारावर आहे.या मुख्य रस्त्यावर अतिक्रमण असल्याने विद्यार्थी व पालकांना शाळेमध्ये ये-जा करण्यासाठी नाहक त्रास सहन करावा लागतो. तसेच दर मंगळवारी आठवडी बाजारादरम्यान तर या ठिकाणी पाय ठेवायला सुद्धा जागा नसते. भविष्यात कोणताही अपघात होऊन या ठिकाणी जीवितहानी



होऊन विपरीत काहीतरी घडू शकते. असे निवेदनात नमूद आहे.या रस्त्यावर पक्क्या अतिक्रमणासह त्यापुढे पुन्हा भाजी मार्केट बसते. त्यामुळे ये-जा करण्यासाठी केवळ दहा ते बारा फुटाचा रस्ता शिल्लक असतो. त्यामुळे भाजीपाला मार्केट हटविणे आवश्यक आहे.यावर उपाययोजना आखून रहदारीकरिता रस्ता पूर्णपणे खुला करून द्यावा व अतिक्रमण काढण्यात यावे अशी मागणी संस्थेचे सचिव धनंजय गोरे यांनी केली आहे.

# प्रभारी गटविकास अधिकाऱ्यांसह दोघां वर लाचलुचपत विभागाची कारवाई

## गट विकास अधिकारी फरार दोन जण ताब्यात

**गडचिरोली । प्रतिनिधी**

अहेरी पंचायत समिती येथील तालुका पेसा समन्वयक (कंत्राटी) संजिव येल्ला कोठारी वय( ४२ ) व खाजगी इसम अनिल बुधाजी गोवर्धन वय (३०) वर्ष राहणार व्यंकटापूर १ लाख ३० हजार रुपयांची लाच रक्कम स्विकारलेवरुन अँटी करप्शन ब्युरो, गडचिरोलीच्या पथकाने दि(२५) शुक्रवारी रंगेहाथ पकडले व यातील मुख्य आरोपी प्रभारी गट विकास अधिकारी प्रतिक दिवाकर चन्नावार फरार असून एसीबी कडून शोध सुरु आहे.

तक्रारदार यांनी मौजा गोविंदगाव येथील तेंदुपत्ता युनिट लिलावात घेवून, सदर तेंदुपत्याचे वाहतूक परवान्याकरीता त्यांना गट विकास अधिकारी, पंचायत समिती अहेरी यांचे नाहरकत प्रमाणपत्राची आवश्यकता होती. ते मिळवून देण्याचे कामासाठी आरोपी प्रतिक चन्नावार, प्रभारी गट विकास अधिकारी, संजिव कोठारी, तालुका पेसा समन्वयक (कंत्राटी) यांनी १ लाख ३० हजार रुपयांची मागणी केली. तक्रारदार यांना आरोपींना लाच रक्कम देण्याची मुळीच इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,गडचिरोली येथील अधिकाऱ्यांशी संपर्क साधून तक्रार दिली.पोलीस उपअधिक्षक अनिल लोखंडे यांचे मार्गदर्शनात पोलिस निरीक्षक श्रीधर भोसले यांनी तक्रारदाराने दिलेल्या तक्रारीची अत्यंत गोपनीय पद्धतीने शहानिशा करून सापळा रचत कारवाईचे आयोजन केले असता,त्यामध्ये पडताळणी दरम्यान तक्रारदार यांनी सन २०२२ यावर्षी मौजा गोविंदगाव येथील तेंदुपत्ता युनिट लिलावात घेवून,सदर तेंदुपत्ताचे वाहतुक परवान्याकरिता त्यांना नाहरकत प्रमाणपत्र मिळवून देण्याचे कामाकरीता आलोसे प्रतिक चन्नावार, प्रभारी गट विकास अधिकारी व आलोसे क. २ श्री संजिव कोठारी, तालुका पेसा समन्वयक, दोन्ही पं.स. अहेरी यांनी १ लाख ३० हजार लाच रक्कमेची पंच साक्षीदारां समक्ष सुस्पष्ट मागणी केली. आलोसे क.२ कोठारी यांचे सांगणे वरुन आरोपी क्र.३ अनिल गोवर्धन, खाजगी इसम हे सदर लाच रक्कम रुपये १ लाख ३० हजार स्वीकारताना रंगेहाथ मिळून आले. यावरुन आलोसे क. १ व २ तसेच खाजगी इसम यांचे विरूध्द पोलीस स्टेशन, अहेरी येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून आलोसे यांचे निवासस्थानांची अँन्टी करप्शन ब्युरोकडून झडती घेण्यात येत आहे.सदरची कारवाई पोलीस अधिक्षक राहुल माकणीकर, अँन्टी करप्शन ब्युरो, नागपूर, सचिन कदम, अपर पोलीस अधिक्षक, ला.प्र. वि. नागपूर, संजय पुरंदरे, अपर पोलीस अधीक्षक,ला.प्र.वि. नागपूर यांचे मार्गदर्शनात व पोलीस उपअधिक्षक अनिल लोखंडे यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्रीधर भोसले, पो. नि. शिवाजी राठोड, पोहवा नथ्थु धोटे, पो.ना. राजेश पदमगिरवार, किशोर जौंजारकर, पोशि संदीप उडान, संदिप घोरमोडे, चापोना प्रफुल डोर्लीकर सर्व लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गडचिरोली यांनी केली.

# ‘अश्विनी’ ने नक्षलग्रस्त बिड्रीची ओळख मिटविली

**आलापल्ली । प्रतिनिधी**

एटापल्ली तालुका म्हणजेच अतिदुर्गम, आदिवासीबहुल व नक्षलग्रस्त म्हणून ओळख. त्यातल्या त्यात बिड्री या गावाचा नाव घेतलं की अंगावर अनामिक शहारे येतात. पूर्वी नक्षल्यांच्या बालेकिल्ला म्हणून या गावाची ओळख होती. मात्र, या गावाला आता अश्विनी अशोक डोनारकर या मुलीने नवी ओळख दिली आहे.

येमली ग्रामपंचायत अंतर्गत येत असलेल्या बिडीची लोकसंख्या जेमतेम ३५० ते ४०० आहे. आता थोडाफार विकास झाला असला तरी पूर्वी या गावात 'ना रस्ते, ना पूल, ना नेटवर्क' अशा परिस्थितीत अश्विनी डोनारकर या शेतकऱ्याच्या कन्येने शिक्षण घेऊन राज्य लोकसेवा आयोगाचा (एमपीएससी) गड सर करत कर व मंत्रालयीन साहाय्यक या पदाला गवसणी घातली आहे. रोज तीन किलोमीटर पायपीट करत, अपुऱ्या सुविधा असताना प्रतिकूल परिस्थितीत यश संपादन करून लेकीने मिळवलेल्या यशाचे अख्ख्या जिल्ह्याला कौतुक आहे.

एटापल्ली तालुक्याची अजूनही अतिसंवेदशील नक्षलग्रस्त व मागास अशी ओळख आहे. तालुक्यात शैक्षणिक विशेष सुविधा नसतानाही बिड़ी गावातील अश्विनी अशोक डोनारकरची महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण होऊन तिची कर व मंत्रालयीन साहायक पदी निवड झाली आहे. अंतिम कौशल चाचणीत राज्यात अनुसूचित जाती प्रवर्गात द्वितीय क्रमांक मिळवून तिने यश काबीज केले. २०२१ मध्ये कोरोनाकाळात तिने परीक्षेसाठी अर्ज केला होता.ऑगस्ट २०२२ मध्ये परीक्षा झाली. ११ मुलींच्या राखीव पदाकरिता १०७ मुलींनी परीक्षा दिली. यात संगणकासह इंग्रजी कौशल्यात तिने



१९९ गुण मिळवत यशावर आपले नाव कोरले. तिचे वडील सामान्य शेतकरी, तर आई गृहिणी आहे. तिच्या यशाने ते भारावून गेले आहेत. विशेष म्हणजे कुठलीही शिकवणी न लावता पहिल्याच प्रयत्नात यश संपादन केल्याने अश्विनी डोनारकरचे सर्वस्तरातून स्वागत होत आहे.अश्विनी डोनारकर हिचे प्राथमिक शिक्षण गावातील जिल्हा परिषद शाळेत झाले. माध्यमिक शिक्षण गावापासून तीन किमीवर असलेल्या येमली येथील हॉयस्कूलमधून पूर्ण केले. यासाठी तिला रोज पायपीट करावी लागत होती. पुढे महाविद्यालयीन शिक्षण तसेच बीएससी, बीएड हे पदवीचे शिक्षण तिने गडचिरोलीत शासकीय वसतिगृहात राहून पूर्ण केले.परिस्थिती कशीही असो पण शासकीय नोकरी मिळवायची ही जिद्द सुरुवातीपासूनच होती. शिक्षक, आई-वडील व बहिणीचे मार्गदर्शन लाभले, त्यामुळे हे यश शक्य झाले. दुर्गम भागातील मुलांनी परिस्थितीमुळे माघार घेऊ नये तर परिस्थिती बदलण्यासाठी शिक्षण घेऊन प्रगती साधावी, असे आवाहन तिने केले आहे.

**एमपीएससीचा गड सर करत झाली मंत्रालयीन साहाय्यक**

घरी आम्हाला दोन्ही मुलीच आहेत. मुलींना शिक्षण देऊन घडवायचं या उद्देशाने तिला माध्यमिक शिक्षणासाठी जिल्हा मुख्यालयात पाठविले. दहाव्या वर्गात चांगले गुण मिळाल्याने वसतिगृहात प्रवेश मिळाला. मुलगी लहानपणापासूनच अभ्यासात हुशार होती. जिल्ह्यात गेल्यावरही ती उच्च माध्यमिक शिक्षणात देखील सातत्य राखले. बारावीनंतर तिला लग्नासाठी ऑफर येत होते. मात्र, नकार देऊन शिकविण्याचा प्रयत्न केला. अशावेळी मुलीला पुढे शिकवून काय करणार? तिला तर दुसऱ्यांच्याच घरी जावे लागणार असे काही लोक टोमणे मारायचे. मात्र माझी मुलगी पुढे काहीतरी करणार ही आशा होती आणि तिच्यात शिकण्याची जिद्द होती. त्यामुळे आज ती या पदावर पोहोचली याचा मला अभिमान आहे.

**लता अशोक डोनारकर (आई)**

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या समाधी स्थळास ‘अ’ वर्ग तीर्थक्षेत्र दर्जा दया

**मुंबई । प्रतिनिधी**



समाजात राष्ट्रभक्ती जागृत करत, अंधश्रद्धा निर्मूलन, जातिभेदाच्या निर्मूलनासाठी आणि ग्रामविकासाचे महत्व पटवून देण्यासाठी भजनांचा आणि कीर्तनाचा प्रभावीपणे वापर करणारे थोर विभूती राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या अमरावती जिल्ह्यातील गुरूकुंज मोझरी येथील समाधी स्थळास अ वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा मिळायला हवा, अशी आग्रही भूमिका घेत राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री ना सुधीर मुनगंटीवार यांनी ग्रामविकास मंत्री ना. गिरीश महाजन यांच्याशी सविस्तर चर्चा केली.

यांसंदर्भात ना. सुधीर मुनगंटीवार यांनी ना. महाजन यांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे कि, आत्मसंयमनाचे विचार त्यांनी ग्रामगीतेतून मांडणाऱ्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी १९३६ साली मोझरी येथे गुरुकुंज आश्रमाची स्थापना केली. महाराजांच्या निर्वाणानंतर याच आश्रमातून त्यांचे विचार आजही जगापर्यंत पोहोचविण्याचे कार्य अविरत सुरू आहे. गुरुदेव सेवा मंडळाद्वारे संचालित अमरावती जिल्ह्यातील गुरूकुंज मोझरीस्थित गुरुदेव सेवाश्रम ही केवळ वास्तू नसून प्रेरणाकेंद्र आहे , ऊर्जास्रोत आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या या समाधी स्थळाला अ वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा मिळावा अशी संपूर्ण गुरुदेव भक्तांची व राष्ट्रीय विचारसरणीच्या प्रत्येकाची मागणी आहे. गुरुकुंज मोझरी येथे दरवर्षी जगभरातून लाखो भाविक भेट देत देतात. महाराजांच्या विचारांचे सोने सर्वत्र पसरवितात त्यांना व तेथे कार्य पुढे नेणाऱ्या गुरुदेव सेवा मंडळाच्या पाठीशी शासनाने सर्व बाजूने उभे राहण्याची आवश्यकता आहे असेही णना मुनगंटीवार चर्चे दरम्यान म्हणाले. स्वातंत्र्याचा अमृतकाळ सध्या सुरू असून याच काळात या प्रेरणास्थळाला अ वर्ग तीर्थक्षेत्रासंदर्भात कार्यवाही व्हावी अशी विनंती ना मुनगंटीवार यांनी केली.

**लक्ष्मणराव गमे सर्वाधिकारी, गुरुकुंज आश्रम**



**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज समाधी स्थळाला अ दर्जा मिळावा म्हणून गुरूकुंज आश्रमा मार्फत २००७ पासून पाठपुरावा केला पण अजून पर्यंत शासनाने दखल घेतली नाही . मी सर्वाधिकारी झाल्या नंतर या क्षेत्राला अ दर्जा प्राप्त व्हावा या दृष्टीने नासुधीरभाऊ मुनगंटीवार यांच्या शिफारशी सह ग्रामीण विकास मंत्री यांना या क्षेत्राला अ दर्जा प्राप्त व्हावा या करिता विनंती केली आहे . ना . सुधीर भाऊ मुनगंटीवार यांनी ग्रामीण विकास मंत्री यांच्याशी चर्चा करून गूरुकुंज आश्रम या क्षेत्राला अ दर्जा देण्याचे आश्वासन मंत्री महोदयांनी दिले आहे. आणि त्या दृष्टीने ना. सुधीर भाऊ मुनगंटीवार यांनी पत्र व्यवहार केलेला आहे .**

# करंजी तंटामुक्त समितीच्या अध्यक्षपदी वैभव निमगडे



**गोंडपिपरी । प्रनिनिधी**

गोंडपिपरी तालुक्यातील करंजी येथे दि.(२५) शुक्रवारी ग्रामसभा पार पडली.करंजी हे गाव राजकीय दृष्ट्या संवेदनशील असून विरोधीपक्षनेते विजय वडेट्टीवार यांची जन्म भूमी असल्याने जिल्ह्यात गावाची वेगळी ओडख आहे.

तंटामुक्त समितीची निवडणूक चुरशीची झाली अनेकांनी निवडणूक प्रक्रियेत भाग घेतला.यावेळी युवा नेतृत्व वैभव निमगडे यांची बहुमताने निवड करण्यात आली.निमगडे यांनी सर्वांना सोबत घेऊन समितीच्यास ध्येय धोरणानुसार येणाऱ्या प्रत्येक तक्रारींचा योग्य न्याय निवाडा करण्याची ग्वाही दिली.निवडीनंतर शिवसेना शहर उपप्रमुख रियाज कुरेशी,जोगापूर शाखा प्रमुख पंकज डांगी,विकी शाहू,छतरसिंग डांगी,अशोक गुंटीवार,धनराज निमगडे,रोहिणी निमगडे,प्रणाली डिंगलवार,सुधाकर बावणे,दिलीप शेटीवार यांच्यासह अनेकांनी अभिनंदन करत जल्लोष साजरा केला

# तब्बल २ वर्षानंतर चामोर्शी नगर पंचायतला मिळाले स्थायी मुख्याधिकारी

**गडचिरोली । प्रतिनिधी**

नगरपंचायत चामोर्शी येथे २३ ऑगस्ट रोजी मुख्याधिकारी म्हणून श्रीकांत शरद फागणेकर रुजू झाले असून तब्बल २ वर्षानंतर स्थायी मुख्याधिकारी मिळाले आहे. श्रीकांत शरद फागणेकर हे यापूर्वी साक्री धुळे नगरपरिषद येथे कार्यरत होते.त्यांचे स्थानांतर झाल्याने नगरपंचायत चामोर्शी येथे ते रुजु झाले.त्यांनी पदभार स्वीकारताच नगर पांच्यातच्या पदाधिकाऱ्यांनी पुषपगुच्छ देऊन स्वागत केले.

चामोर्शी नगरपंचायत येथील तत्कालीन मुख्याधिकारी सतिश चौधरी यांचे ८ सप्टेंबर २०२१ ला स्थानांतरण झाले.तेव्हा पासून येथील अतिरिक्त प्रभार उपविभागीय अधिकारी उत्तम तोडसाम यांच्याकडे होता.जवळ पास २ वर्षानंतर आता चामोर्शी नगर पंचायतीला



स्थायी मुख्याधिकारी मिळाले आहे. पदभार स्वीकारताच नगरपचायत कार्यश्रेत्रातील माहिती जाणून घेऊन कार्यालयीन कर्मचाऱ्याची त्यांनी आढावा बैठक घेत मार्गदर्शन केले.यावेळी नगराध्यक्ष जयश्री वायलालवार, उपनगराध्यक्ष लोमेश बुरांडे, बांधकाम सभापती वैभव भिवापुरे, पाणी पुरवठा सभापती निशांत नैताम,बालकल्याण सभापती गिता सोरते, अभियंता निखिल कारेकर, कर्मचारी दिलीप लाडे, रमेश धोडरे, विजय पेद्दीवार , प्रभाकर कोसरे ,हाफिज सय्यद , सतोष भांडेकर , बाळा धोडरे , राकेश वासेकर , आकाश कोडवते , स्नेहल भुरसे , अलकेश बनसोड , प्रमोद राऊत , शुभांगी यारावार , सरस्वती राऊत , सुभाष कनकुटलावार , अशोक नवले , रमेश कनकुटलावार ,दिपक सातार उपस्थित होते

# क्रीडा पर्वाचे आ. किशोर जोरगेवार यांच्या हस्ते उद्घाटन

**वरोरा । प्रतिनिधी**

डेव्हलपमेंट अँड रिसर्च एज्युकेशन मल्टीपर्पज सोसायटी (ड्रीम) चंद्रपूर तर्फे क्रीडा दिनाच्या पूर्वसंध्येला हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या जयंती व क्रीडा दिनाचे अवचित साधून क्रीडा पर्वाचे आयोजन २६ऑगस्ट ते २९ ऑगस्ट २०२३ दरम्यान करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन आ. किशोर जोरगेवार यांच्या हस्ते पार पडले.कार्यक्रमाचेअध्यक्षस्थानी पप्पू देशमुख माजी नगरसेवक मनपा चंद्रपूर होते.



प्रमुख पाहुणे म्हणून अभिजीत दुर्गे उपाध्यक्ष ड्रीम चंद्रपूर, रुपेशसिंग चौहान सचिव हॉकी प्रमोटर असोसिएशन चंद्रपूर, प्रभाकर टोगर उपाध्यक्ष हॉकी प्रमोटर असोसिएशन चंद्रपूर, निखिल पोटदुखे सचिव डी नेटबॉल असोसिएशन जिल्हा चंद्रपूर उपस्थित होते. ४दिवस चालणाऱ्या या क्रीडा पर्वात २६ ऑगस्ट ला नेटबॉल स्पर्धा, ही स्पर्धा जिल्हा स्टेडियम ला खेळली जाणार आहे. २७ आगस्ट ला हॉकी स्पर्धा ही स्पर्धा सी आर सी स्टेडियम येथे खेळली जाणार आहे. २८ ऑगस्ट ला कबड्डी स्पर्धा ही स्पर्धा अंश्लेश्वर वार्ड नं. १विद्यार्थी चौक चंद्रपूर येथे खेळली जाणार आहे. तसेच २९ ऑगस्ट ला संध्याकाळी ४वाजता बाईक रॅली व त्यानंतर क्रीडा पर्वा चा समारोपीय कार्यक्रम संध्याकाळी ६ वाजता स्थानिक श्रमिक पत्रकार संघ वरून नाका चंद्रपूर येथे आयोजित करण्यात आला आहे.या क्रीडा पर्वात होणाऱ्या विविध कार्यक्रमात जास्तीत जास्त सहभाग दर्शवावा अशी विनंती ड्रीम चंद्रपूरचे अध्यक्ष प्रेम गावंडे, उपाध्यक्ष अभिजीत दुर्गे, सचिव अनिल ठाकरे, कोषाध्यक्ष निलेश शेंडे तसेच रुपेश सिंग चैव्हाण, शुभम साखरे, शुभम पुणेकर, आकाश इंगळे, मनीष जयसल, लोकेश मोहुर्ले, दिनेश सावसागडे, सिद्धार्थ सूर्यवंशी यांनी केले आहे.

# आदिवासीबहुल भागात उत्कृष्ट खेळाडूंची खाण : ना.आत्राम



**गडचिरोली । प्रतिनिधी**

आदिवासी युवक-युवतीमध्ये उत्तम कलागुण, बौद्धिक क्षमता व क्रीडा कौशल्य भरभरून आहे.त्यामुळे याठिकाणी उत्कृष्ट खेळाडूंची खाण असल्याचे प्रतिादन राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री धर्मराव बाबा आत्राम यांनी केले.ते शनिवार (२६ ऑगस्ट) रोजी एटापल्ली तालुका मुख्यालयातील क्रीडा संकुलाच्या उदघाटन प्रसंगी बोलत होते.

यावेळी मंचावर माजी जि प अध्यक्ष तथा सिनेट सदस्य भाग्यश्री आश्रम,माजी प स सदस्य हर्षवर्धन बाबा आत्राम, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष रवींद्र वासेकर, युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष लीलाधर भरडकर, रिंकू पापडकर, नगराध्यक्ष दीपयंती पेंदाम, जिल्हा क्रीडा अधिकारी दोंदल, तालुका क्रीडा अधिकारी गाढले,माजी पंचायत समिती सभापती बेबी नरोटे,माजी जि प सदस्य ग्यानकुमारी कौशी, रार्कॉ चे तालुका अध्यक्ष श्रीकांत कोकुलवार,पौर्णिमा श्रीरामवार,जितेंद्र टिकले,रामजी कत्तीवार,संभाजी हीचमी,सपना कोडापे आदी मान्यवर उपस्थित होते.पुढे बोलताना या भागातील युवक युवतीमधील विविध कलागुण बाहेर काढून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू घडविण्यासाठी शासन कटीबद्ध आहे.एटापल्ली सारख्या आदिवासीबहुल भागात उत्तम असे खेळाडू आहेत त्यांना योग्य प्रशिक्षण देण्याची गरज आहे. त्यामुळे शिक्षण,आरोग्य,रोजगारसोबतच क्रीडा क्षेत्रातही काम करण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे मत मंत्री धर्मराव बाबा आत्राम यांनी व्यक्त केले.तत्पूर्वी १० महिन्यापूर्वी भूमिपूजन केलेल्या क्रीडा संकुलाचे बांधकाम पूर्ण झाल्याने त्याचे लोकार्पण मंत्री धर्मराव बाबा आत्राम यांच्या हस्ते करण्यात आले.कोट्यवधी रुपयांच्या निधीतून येथील क्रीडा संकुल बांधकाम करण्यात आले असून याठिकाणी ट्रॅक,संवरक्षन भिंती तसेच आदी विकास कामासाठी आणखी किती निधी लागणार याची माहिती घेऊन लवकरात लवकर आराखडा तयार करण्याचे निर्देश त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

# मागील वर्षीच्या पीक विमा लाभापासून शेतकरी वंचित राष्ट्रवादीचे सचिन पचारे यांचे मंत्री आत्राम यांना निवेदन

**मारेगाव । प्रतिनिधी**

मागील वर्षी खरीप हंगामातील पीक विम्याचे पैसे अजून पावेतो ए.आय.सी (एग्रीकल्चरल इन्शुरन्स कंपनी) ने शेतकऱ्यांच्या खात्यात वळते केले नसल्याने सदर नुकसान भरपाईची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात यावी अशा आशयाचे निवेदन राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष सचिन पचारे यांनी अन्न व औषध प्रशासन कॅबिनेट मंत्री धर्मराव बाबा आत्राम यांना दिले.

मागील वर्षी एआयसी कंपनीने यवतमाळ जिल्ह्यात ४ लाख शेतकऱ्यांचा विमा काढला होता. १८ जुलै २०२२ रोजी तालुक्यात महापूर झाल्याने प्रत्यक्षात ३ लाख ४९ हजार शेतकऱ्यांनी तक्रारी नोंदविल्या होत्या. एआयसी कंपनीने



सर्व शेतकऱ्यांना नुकसान भरपाईची रक्कम द्यावयाची असताना केवळ २० ते ३० टक्के शेतकऱ्यांना नुकसान भरपाई दिली आहे.एकट्या मारेगाव,वणी व झरी तालुक्यात ४७ हजार तक्रारी असून त्याकडे अन्न व औषध प्रशासन कॅबिनेट मंत्र्यांनी स्वतः जातीने लक्ष देवून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ नुकसान भरपाई देण्यात यावी अशा आशयाचे निवेदन राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे यवतमाळ जिल्हा उपाध्यक्ष सचिन पचारे यांनी अन्न व औषध प्रशासन कॅबिनेट मंत्री धर्मराज बाबा आत्राम यांना दिले.

# राष्ट्रवादी काँग्रेस चंद्रपूर जिल्हाध्यक्ष (ग्रामीण)निरीक्षक पदी पनकुले

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (ग्रामीण) चंद्रपूर जिल्ह्याच्या निरीक्षक पदावर नागपूर येथील ज्येष्ठ नेते दिलीप पनकुले यांची नियुक्ती प्रांताध्यक्ष जयंत पाटील यांनी केली.या नियुक्तीचे पत्र माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्या हस्ते देण्यात आले.

यावेळी माजीमंत्री रमेश बंग,पक्षाचे जेष्ट नेते उपस्थित होते. या नियुक्तीचे जिल्हा चंद्रपूर ग्रामिण जिल्हाध्यक्ष राजेन्द्र वैद्य, प्रदेश सरचिटणीस मुनाज शेख,राष्ट्रवादी युवक प्रदेश कार्याध्यक्ष नितीन भटारकर, प्रदेश सरचिटणीस हिराचंद बोरकुटे , महीलाध्यक्ष बेबी ऊईके, युवक अध्यक्ष सोमानी, विद्यार्थी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सुजीत ऊपरे यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या .



# जिल्हास्तरीय एड्स पथनाट्य स्पर्धेत आनंदनिकेतन महाविद्यालयाची चमू द्वितीय



**वरोरा :-**एड्स प्रतिबंध व नियंत्रण कक्ष सामान्य रुग्णालय चंद्रपूर व रोटरी क्लब चंद्रपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एड्स पथनाट्य स्पर्धेत आनंदनिकेतन महाविद्यालयाच्या चमूला द्वितीय पारितोषिक मिळाले.१२ ऑगस्ट आंतरराष्ट्रीय युवा दिनाच्यानिमित्ताने चंद्रपूर येथे या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

विविध महाविद्यालयाच्या जवळपास चौदा चमुने या स्पर्धेत सहभाग नोंदवला.आनंदनिकेतन महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना व रेड रिबन क्लब या उपक्रमाच्या अंतर्गत प्रा. मोक्षदा नाईक यांचे लेखन,दिग्दर्शक असणाऱ्या कॉलेजच्या चमूने पथनाट्य करून द्वितीय पारितोषिक प्राप्त केले.विशेष म्हणजे या स्पर्धेत अनेक वर्षापासून महाविद्यालयाच्या टीमला पारितोषिक मिळत आहे.कु.निकिता माणूसमारे कु. आचल चिकटे,कु.मनस्वी खामनकर, कु.जानवी परचाके, कु.तेजस्विनी काळे, कु.आशुतोष सोयाम,कु.स्वप्नील देऊळकर या विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर केले.या यशात ग्रामीण रुग्णालय वरोरा चे समुपदेशक गोविंद कुंभारे यांचे मार्गदर्शन, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मृणाल काळे यांचे प्रोत्साहन व राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.मोक्षदा नाईक यांचे नेतृत्व व प्रा.सुरेश राठोड यांचे सहकार्य मोलाचे ठरले..

सह्याद्री चा राखणदार साप्ताहिक वृत्तपत्र मालक , प्रकाशक , संपादक आशीष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टिसर्व्हिसेस कर्मवीर वॉर्ड वरोरा येथून मुद्रित करून मातृछायाभवन कर्मवीर वॉर्ड वरोरा येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही. यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालयाअंतर्गत होईल.

A weekly newspaper `SAHYADRI CHA RAKHANDAR` printed by *Suraj Bhaktraj Ghume* ,sahyandri multiservices, karmveer ward , warora 442907 (M.H ) on behalf of Ashish Maroti Ghume owner, publisher & Editor of sahyadri cha rakhandar ` matruchaya bhawan ` , karmveer ward warora 442907(M.H) . the editer may not be agree with the published content . in case any objection , the content will be redressed under warora court RNI NO : MAHMAR/2018/77866

CONTACT NUMBER :- Ashish Ghume 9011708840, Suraj Ghume 9673560360 EMAIL :- sahyandrinews@gmail.com EPAPER :- epaper.sahyandrinews.com